दि १४.७.९५
सकाळी ११ वाजता
मिळाले.

जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि/९५
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक:- 30-6-95

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद, पुणे विभाग

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका
प्राथमिक शिक्षण मंडळ

विषय:- सन १९९५-९६ च्या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत माध्यम ~~भाषेच्या~~ इंग्रजी

संदर्भ:- शासन शालेय शिक्षण विभागाकडील जा.क्र. व्हीएसएस १०९५/[३५५] प्राशि-३, दि. 30-5-95

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे आपण समक्ष भेट देऊन सोबतच्या विहीत नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झाले नंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे / न देणे या बाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

[१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी. केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

[२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

[४] संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

[५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

[६] संस्थेने विहित नमुन्यात सुधारीत शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नाव, शाळेचे ठिकाण यात बदल नाही.

[७] शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

...२...

2023/07/10 10:35

[८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्राची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

[९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

[१०] सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करूनच मान्यता प्रदान करावी.

[११] सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

[१२] शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम सोडता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही. याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

[१३] संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे, त्या वर्षी संस्थेने शाळा सुरु न केल्यास शाळेच्या नुतनीकरणासाठी अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील, अन्यथा शाळेस द्यावयाची परवानगी आपोआप रद्द करण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

वरील सर्व अटींच्या पूर्ततेचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेनंतरच पुढील आदेश निर्गमित केले जातील.

स्वाक्षरित शि. उ. सं. यांची सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करीता

प्रत,

१] मा. अवर सचिव
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,
विस्तार भवन, मुंबई-३२ यांचेकडे माहितीस्तव सादर.

२] मा. शिक्षण संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
यांचेकडे माहितीसाठी सादर.

३] प्रत,
सचिव/अध्यक्ष
संबंधित संस्था सोसायटी ऑफ सेंट मेरी द व्हर्जिन इन इंडिया
गुरुवार पेठ पुणे-४२.

Primary Section (sanction)

शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर,पुणे— ४११ ००५.
जा.क्र./मनपा/खाप्राशा/४७८२/२००१-२००२,
पुणे,दिनांक :- ३।१।०२

शाळाप्रमुख,
टापिफनी प्रायमरी स्कुल,
पंचहौद पुणे.

विषय :- खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना-अनुदानित प्राथमिक शाळांना सन २०००-२००१ या वर्षी इयत्ता १ ली ते ७ वी चे नवीन अतिरिक्त तुकडया/वर्ग मंजूर करणेबाबत.

संदर्भ :- १] प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे क्रमांक-खाप्राशा/२०००/तुमा/६०७३२/ड-५१२ दि.२९.११.२००१.

२] मा.शिक्षण उपसंचालक यांचेकडील पत्र जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/वर्ग-तुकडी/मंजूरी/पुवि/२६३०७/०९ दि. १३.१२.२००१.

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार करता उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या अतिरिक्त वाढीच्या तुकडया ~~विनाअनुदान~~/कायम विनाअनुदान तत्वावर जून २००० पासून सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी वाढ नैसर्गिक/अतिरिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | टापिफनी प्रायमरी स्कुल | इंग्रजी | इ. २री व ३री चा प्रथम वर्ग | नैसर्गिक |

....२/-

अटी व शर्ती :-
==========

१. ज्या शाळांना जून २००० पासून विनाअनुदान तत्वावर वर्ग/तुकडया मंजूरी देण्यात आलेली आहे या वर्ग/तुकडया भविष्यात जून २००४ पासून अनुदानास पात्र ठरवितांना शासन निर्णय क्रमांक-व्हीएलएस-१०००/[२४५५]/प्राशि-१ दि.८.११.२००० मधील अटी व निकषांचा अवलंब करावा व अनुदानास पात्र ठरणाऱ्या या वर्गाला/तुकडयांना आवश्यक असणारी आर्थिक तरतूदीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे त्या वर्षी उपलब्ध करुन घेण्याची दक्षता संबंधित शिक्षणाधिकारी [प्राथमिक] जिल्हा परिषद/शिक्षण प्रमुख,महानगरपालिका शिक्षण मंडळ,/प्रशासन अधिकारी,महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ यांनी घ्यावी.

२. शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३. सदर शाळेने वर्ग/तुकडयांसाठी सर्व भौतिक,शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

४. सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सुविधा चांगली असणे आवश्यक आहे.

५. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

६. सदर मंजूर करण्यात येणाऱ्या वर्ग/तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील पट व उपस्थितीवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

७. सदर शाळेच्या मंजूर करण्यात आलेल्या या वर्ग/तुकडीत विद्यार्थी संख्या कायम पुरेशी असणे आवश्यक आहे.

८. तपासणी अंती एक जरी अट अथवा शर्त नियमबाह्य निदर्शनास आल्यास वर्ग/तुकडी मंजूरी रद्द करण्यात येईल.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका.

प्रत - माहितीसाठी.

१] मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे - ४११ ००१.

शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
शिवाजीनगर,पुणे - ४११ ००५,
जा.क्र./मकमा/खाप्राशा/४३५४/२००१-२००२,
पुणे,दिनांक :- ८/७/०२

शाळाप्रमुख,
इपिफनी प्रायमरी स्कूल
गुरुवार पेठ,
पुणे

विषय :- खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना-
अनुदानित प्राथमिक शाळांना सन २०००-२००१
या वर्षी इयत्ता १ ली ते ७ वी चे नवीन अतिरिक्त
तुकड्या/वर्ग मंजूर करणेबाबत.

संदर्भ :- १] प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे क्रमांक-खाप्राशा/
२०००/तुका/६०७३२/ड-५१२ दि.९.८.२००१.
२] मा.शिक्षण उपसंचालक यांचेकडील पत्र जा.क्र. प्रा/
प्राशि/खाप्राशा/तुका/पुवि/~~२००१~~ दि. ~~१८.८.२००१.~~
४२९५७/७२ दि.२७/७/०२

संदर्भांकित पत्रास अनुसरून तुमचे शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या अतिरिक्त तुकड्या/वर्गांना सन २०० - २०० या वर्षात शासन परिपत्रक क्रमांक व्ही.एल.एस-१०००/[७४३/२०००]प्राशि-३ दिनांक ११.७.२००१ मधील विहित अटींना अधीन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

| शाळेचे माध्यम | शासनाने मंजूर केलेली अतिरिक्त तुकडी/नवीन वर्ग | | | | | | | अनुदानित/विना-अनुदानित/कायम विनाअनुदानित कालांतराने अनुदान तत्वावर येणाऱ्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ ली | २ री | ३ री | ४ थी | ५ वी | ६ वी | ७ वी | |
| इंग्रजी | | | | प्रथम वर्ग | प्रथम वर्ग | | | कायम-विना अनुदानित |

– पान दोन –

शाळेने सदरचे वर्ग अथवा तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

अ] शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे. [एस.एस.सी.डी.एड]

ब] सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन दयावयास हव्यात.

क] सदर शाळेने स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

[illegible]

ड] शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

इ] सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

ई] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

प्रत – माहितीसाठी.
१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे – ४११ ००१.

"कायम विनाअनुदानित"

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"शिक्षण विभाग [प्राथमिक]
यशवंतराव चव्हाण भवन"
जा.क्र. जिप/शिक्षण/प्राथ/२/२१/ /२००
पुणे दिनांक:- / /२००

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
एपिफनी स्कूल पेंचहौंद
पुणे-४२

विषय:- इंग्रजी माध्यमाच्या "कायम विनाअनुदान तत्वावरील"शासन मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्याप्रथम/जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत. [माध्यम-इंग्रजी]

संदर्भ:- शासन निर्णय क्रमांक व्हीएसएस-१००२/[१०००/०२]/प्राशि-३ दिनांक:- १४ जानेवारी २००३.

वरिल विषयासंबंधिचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्याचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथ /जादा तुकड्या/वर्ग जून-२००2 पासून सन २००2-२००3 या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शवि आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | एपिफनी स्कूल, पेंचहौंद पुणे-४२ | इंग्रजी | इ.६वी चा प्रथम वर्ग | नैसर्गिक | मंजूर/ ~~नामंजूर~~ |

अटी व शर्ती
===========

१] शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायीक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहीजे.
२] सदर शाळेने तुकड्यासाठीसर्व भौतीक सुविधा तसेच शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून नेमला पाहीजे.
३] सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे.
५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही. याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६] सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७] तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करणेत येईल.

[illegible]

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद, पुणे-१ करिता

प्रत:- माहिती व योग्य त्या कार्यवाहिसाठी रवाना.
१] सचिव/अध्यक्ष, सोसायटी ऑफ सेंट मेरी व्हर्जिन इन इंडिया, पंचहौद
२) शिक्षणप्रमुख
शिक्षणमंडळ, पुणे मनपा.

2023/07/10 10:39

कायम · विना · अनुदानित :- ✓

पुणे जिल्हा परिषद,पुणे
"शिक्षण विभाग (प्राथमिक)
यशवंतराव चव्हाण भवन"
जा. क्र. जिप/शिक्षण /प्राथ/२/२१/१६/२००३.
पुणे. दिनांक :-१४/७/२००३.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

एपिफनी प्रायमरी स्कुल.
५, गुरुवार पेठ पंचहौद
पुणे · ४२.

विषय :- इंग्रजी माध्यमाच्या "कायम विनाअनुदान तत्वावरील" शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत. (माध्यम-इंग्रजी)

संदर्भ :१) शासन निर्णय क्रमांक व्हीएतएस-१००२/(१०००/०२/)/प्राशि-३
दिनांक :- १४ जानेवारी २००३
२) आपला प्रस्ताव जा-क्र. ४५/03 दि. ८/७/2003

वरील वेषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम / जादा तुकडया / वर्ग जून - २०० पासून सन २०० -२०० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून (कायम विनाअनुदान तत्वावर) मंजूर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा / नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1) | एपिफनी प्रायमरी स्कुल, पंचहौद पुणे-४२ | इंग्रजी. | इ ७ वी च्या प्रथम वर्ग | नैसर्गिक | मंजुर. |

अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायीक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहीजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहीजे.
३. सदर शाळेस स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही. याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विदयार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रदद करणेत येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याचे अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / अध्यक्ष
सोसायटी ऑफ सेंट मेरी द व्हर्जिन इन इंडिया.
पंचहौद गुरुवार पेठ पुणे- ४२.
२) मा. शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, म.न.पा. पुणे. ५

2023/07/10 10:40

जा.क्र.माध्य.३/ १४ /नमाशा/ ९२९५५५४ /पुवि/२००२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : ~~२० MAR 2002~~
21 MAR 2002

प्रति,

सचिव, दि सोसायटी ऑफ सेंटमेरी
द व्हर्जीन इन इंडिया
पुणे.

विषय :- २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत . . .

संदर्भ :- १. शासन पत्र क्रमांक नमाशा/ १००१( ८९८/२००१)/माशि-१ दिनांक २०.१२.२००१

२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक अमाशा/३०२ के/नमाशा/६५१७०/३५-क, दिनांक २८.९.२०००

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | दि सोसायटी ऑफ सेंट मेरी द व्हर्जीन इन इंडिया, पुणे. | गुरुवार पेठ, पुणे. | आठवी | इंग्रजी |

कायम विना अनुदान

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटोंची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

१. आपल्या संस्थेची वरती नमुद केलेल्या नविन माध्यमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
२. सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे..
३. शासनाच्या पुर्वपरवानगीचे निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.
४. आपण आपल्या संस्थेच्या अध्यक्षांचे सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र (रु.२०/- च्या स्टँप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सादर करावे.
५. आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
६. "कायम विनाअनुदान तत्वावर मिळालेली शाळा" असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे..
७. सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने/शाळेने संबंधित अधिका-यांशी/शासनाशी पत्रव्यवहार करतांना "कायम विनाअनुदानित शाळा" अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.
८. आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १९६० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
९. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
१०. सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
११. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबीत नाही.
१२. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १२ विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसांचे आत आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे.

मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे.
आपण संबंधित संस्थेची अटोंच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

प्रत : २. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर
२. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना सविनय सादर

ओशी/namasha/०८०५२००१

2023/07/10 10:40

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा./९वी/२००२
पुणे, दि. १२/७/२००२.

प्रति,

सचिव/मुख्याध्यापक,
एपिफनी इंग्लीश स्कूल, गुरुवार पेठ,
पुणे २.

विषय :- इ. ९ वी च्या वर्गास प्रथम मान्यता देणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या एपिफनी इंग्लीश स्कूल, गुरुवारपेठ. या माध्यमिक विद्यालयातील इ. ८वी च्या वर्गास मा. शि. उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र.माध्य-३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/२७०७४/०१ दि२४/४/०२ अन्वये परवानगी देणेत आलेली आहे. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२ नुसार उपरोक्त शाळेत जून २००१ पासून इ. ९ वीच्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देणेत येत आहे.

१] स्वतंत्र प्रयोगशाळा असावी.
२] प्राथमिक - माध्यमिक विभागाचे रेकॉर्ड स्वतंत्र असावे.
३] विद्यार्थी संख्या वाढवावी.
४] फी वाढीस शासन परवानगी घेणेत यावी.
५]
६]

मा. शि. अ. यांची
मान्य टिप्पणी

शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे.

प्रत,
१. मुख्याध्यापक,

2023/07/10 10:38

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा./०२-०३
पुणे, दि. १८/६/२००२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
एपिफनी इंग्लीश स्कूल, शुक्रवार पेठ.
पुणे २

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ०२-०३
~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, ~~इ. ९ वी~~, इ. १० वी.

आपल्या दी सोसा.ऑफ सेंटमेरी द व्हर्जिन इन इंडिया या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित एपिफनी इंग्लीश स्कूल, शुक्रवारपेठ माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी /~~इ. ५ वी~~ या वर्ग सुरु करणेस सन २००० - २००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/२००१-०२, दि.२४/५/०२ अन्वये सन २००१-०२ या शै. वर्षापासून इ. ९ वी च्या वर्गास नैसर्गिक परवानगीने शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००२ - २००३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, ~~इ. ९ वी~~, इ. १० वी या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि.प. पुणे / ~~गट शिक्षणाधिकारी, पं.स.~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

J.N.H.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

2023/07/10 10:38

## सांकेतिक क्रमांकासाठी प्रस्तावासोबत जोडावयाच्या प्रमाणपत्रांची यादी.

१. मुखपृष्ठ पत्र.

२. विहित नमुन्यातील शिफारस प्रपत्र [इंग्रजी व मराठी]

३. या कार्यालयाने दिलेल्या शाळा परवानगी पत्राची प्रत.

४. या कार्यालयाने दिलेल्या प्रथम मान्यता पत्राची प्रत.

५. इ. ९ वी, इ. १० वी नैसर्गिक वाढीने परवानगी पत्र.

६. शाळा वार्षिक तपासणी अहवाल.

७. संस्थेची घटना. [झेरॉक्स प्रत साक्षांकित केलेली.]

८. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी. मा. धर्मादाय आयुक्त यांनी मान्य केलेली.

९. इ. १० वी तील विद्यार्थ्यांची यादी.

१०. शासन निर्णय व खात्याचे नियम काटेकोरपणे पालन करणेबाबत संस्थेचे रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्थाप्रमुखाचे हमीपत्र.

११. संस्थेविरुध्द गैर व्यवहाराबाबत अथवा न्यायालयात प्रकरण नसलेबाबत संस्था प्रमुखांचे हमीपत्र व त्यावर संबंधित तपासणी अधिकारी यांची स्वाक्षरी.

सदर कागदपत्रे दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावी व एक प्रत विभागीय शिक्षण मंडळाकडे सादर करावी.

---

2023/07/10 10:38

2:00 वाजता
29/8/03

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११ ००५.

क्रमांक : पुविमं/डीपी/सां.क्र./
पुणे ४११ ००५.
दिनांक : ३० /०८/२००३.

प्रति,

मुख्याध्यापक / ~~प्राचार्य,~~
--------------------
--11.959--------
--------------------

विषय : शाळा क्रमांक / कनिष्ठ महाविद्यालय, क्रमांकामध्ये तालुका/शाळा सांकेतिक क्रमांक समाविष्ठ करून नविन क्रमांक देणेबाबत......

माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेकरिता मंडळ कार्यालयाने आपणास दिलेले शाळा / कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक प्रशासकीय कारणास्तव बदलण्यात आलेला असून यापुढे आपणास पुर्वीचा --11.959------ ऐवजी--11-15-145-- हा नवीन सांकेतिक क्रमांक देण्यात येत आहे.

तरी वरीलप्रमाणे शाळा / कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांकाचा झालेला बदल शाळेच्या मुखपृष्ठावर (लेटरहेड) वर शाळेचा पुर्वीचा सांकेतिक क्रमांक व [illegible] नविन सांकेतिक क्रमांक असे दोन्ही सांकेतिक क्रमांक छापावेत. तसेच फेब्रुवारी/मार्च २००४ परीक्षेची आवेदनपत्रे नविन शाळा सांकेतिक क्रमांकानुसार मंडळाकडे पाठविण्यात यावीत याची नोंद घ्यावी. तसेच शासकीय व पत्रव्यवहारासाठी पुर्वीच्या व नविन सांकेतिक क्रमांकाचा उल्लेख करावा. तसेच सोबतचे परिशिष्ठ अ व ब त्वरित सादर करावे.

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे - ४११ ००५.

प्रत माहितीस्तव,

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे/अहमदनगर/सोलापूर.

2023/07/10 10:40